23 SEP 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रयत शिक्षण संस्था काळाच्या पुढे पाच पावले

## डी. टी. शिर्के : साताऱ्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : 'ज्या संस्थांत सर्वोच्च व्यवस्थापन सातत्याने कार्यरत राहून काळाची पावले ओळखून सकारात्मकतेने आढावा घेत वाटचाल करते, ते यशोशिखरावर पोहोचतात. त्यामुळे रयत शिक्षण संस्था ही काळाच्या पुढे पाच पावले आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

सातारा येथे रयत शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंती कार्यक्रमात कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे आदी उपस्थित होते.



सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई पाटील यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी स्मृतिस्थळाला मान्यवरांनी पुष्पार्पण करून अभिवादन केले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन अनिल पाटील, कुलगुरू, डी. टी. शिर्के, भगीरथ शिंदे, सचिव विठ्ठल शिवणकर आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'कर्मवीर अण्णांना छत्रपती शाहू महाराजांचा सहवास लाभला. त्यांचा प्रभाव रयत शिक्षण संस्थेवर पडला. त्यामुळे रयत संस्था ही शाहू महाराज यांचे जिवंत स्मारक आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कर्मवीर अण्णांनी सातारा येथे मिश्र वसतिगृह उभारले. आज ७५ वर्षांनंतरही आपण शिक्षण पद्धतीवर समाधानी नाही. आता आपणाला ऑनलाइन आणि दूर शिक्षणाचा विचार करावा लागेल.' असे शिर्के म्हणाले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात कर्मवीरांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची जयंती शिवाजी विद्यापीठात गुरुवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. जगदीश सपकाळे उपस्थित होते.

2 3 SEP 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करवीरच्या छत्रपती जिजाबाईंचे शौर्य प्रेरणादायी

## युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती; डॉ. विजयाराणी पाटील लिखित पुस्तकाचे प्रकाशन



कोल्हापूर : 'महाराणी जिजाबाई' पुस्तक प्रकाशनप्रसंगी संयोगिताराजे, पी. एस. पाटील, रमेश जाधव, भारती पाटील, विजयाराणी पाटील.

कोल्हापूर, ता. २२ : 'करवीरच्या छत्रपती जिजाबाईंनी गाजवलेले शौर्य प्रेरणादायी आहे,' असे प्रतिपादन संयोगिताराजे छत्रपती यांनी येथे केले. लेखिका डॉ. विजयाराणी पाटील यांनी जिजाबाईंच्या चरित्राचा घेतलेला शोध म्हणजे महिलांच्या तेजस्वी इतिहासाला उजाळा आहे, असेही त्या म्हणाल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे 'महाराणी जिजाबाई : कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या' पुस्तक प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते. वस्तू संग्रहालय येथे कार्यक्रम झाला.

संयोगिताराजे म्हणाल्या, ''छत्रपती ताराराणी यांनी कोल्हापूर संस्थानाची स्थापना केली, तर कोल्हापूर राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी छत्रपती जिजाबाईंनी केली. डॉ. पाटील यांनी हे पुस्तक प्रकाशनचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.''

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव म्हणाले, ''हे पुस्तक प्रकाशित करून लेखिकेने करवीर संस्थांनाच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे. ज्या विषयावर माहिती उपलब्ध नाही, त्या विषयावर पीएच.डी. करून डॉ. विजयाराणी पाटील यांनी मोठे धैर्य दाखवले आहे.''

समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी ताराराणी यांच्या सून जिजाबाई यांनी कोल्हापूर राज्याचे संरक्षण केले. सती बंदीचा कायदा केला, पण जिजाबाईबद्दल माहिती नव्हती.''

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, सुनीलकुमार लवटे, डॉ. एस. एन. पवार उपस्थित होते. प्रा. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. सुष्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# 'एम. ए. मास कम्युनिकेशन'च्या समन्वयकपदी शिवाजी जाधव

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या समन्वयकपदी पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. जाधव यांना विद्यापीठ प्रशासनाकडून नियुक्तीचे पत्र देण्यात आले. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवली. डॉ. जाधव यांना पत्रकारितेतील सोळा वर्षांचा अनुभव आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदारापासून सहयोगी संपादक पदापर्यंत विविध टप्प्यांवर त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात काम केले आहे. पत्रकारितेशी संबंधित त्यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना पत्रकारिता व जनसंवाद विषयातील पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचेही ते समन्वयक आहेत.


लोकमत

# पीएच. डी. परीक्षेला ११६७ परीक्षार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध विद्याशाखांच्या एकूण १७ पीएच. डी. अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील केंद्रांवर गुरूवारी झाली. त्यासाठी १,६६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १,१६७ जणांनी परीक्षा दिली. ५०१ विद्यार्थी गैरहजर राहिले. दिवसभरात तीन सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात आली.

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव अध्यासनामध्ये उद्या अभिनेता सुमित पाटील यांचे व्याख्यान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझमच्या २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमाचा प्रारंभ शनिवारी (दि. २४) होत आहे.

यानिमित्त अभिनेता, कंटेंट क्रिएटर सुमित पाटील यांचे 'मिम्सचे तंत्र' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यासनाच्या नवीन इमारतीमध्ये दुपारी साडेबारा वाजता हा कार्यक्रम होईल.

पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांसोबतच मिम्समध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या सर्वांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# मास कम्युनिकेशनच्या समन्वयकपदी डॉ. जाधव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या समन्वयकपदी पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागातील सहा. प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. नुकतेच डॉ. जाधव यांना विद्यापीठ प्रशासनाकडून नियुक्तीचे पत्र देण्यात आले.



कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवली आहे. त्यांना पत्रकारितेतील १६ वर्षांचा अनुभव आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदारापासून सहयोगी संपादक पदापर्यंत विविध टप्प्यांवर त्यांनी पत्रकारितेत काम केले आहे. पत्रकारितेशी संबंधित त्यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अलीकडेच त्यांना पत्रकारिता व जनसंवाद विषयातील पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे ते समन्वयक आहेत.

तरूण भारत

# विद्यापीठ पीएच.डी. परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १७ विषयांची तीन परीक्षा केंद्रावर पीएच. डी. प्रवेशपूर्व परीक्षा सुरळीत पार पडली. कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यातून या परीक्षेला १६६८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ११६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ५०१ विद्यार्थी अनुपस्थित होते. ही परीक्षा तीन सत्रात झाली. आज (दि. २३) आणि शनिवार २४ सप्टेंबर रोजी विविध विषयांची तीन सत्रात प्रवेशपूर्व परीक्षा होणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

Times of India

# Shivaji varsity elections on November 14

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has announced the schedule for the elections of senate, academic council and study forums.

The draft roll of the voters, who are graduates, teachers, have been finalised. The voting will take place on November 14. For senate, six representatives from the management, 10 college professors, three university professors and 10 registered graduates will be elected. The senate is the apex boy of the university and has principal authority for all financial estimates, budgetary appropriations and providing social feedback on current and future academic programmes.

For the academic council, eight professors from various departments of the colleges and university will be elected. The academic council is responsible for lying down the academic policies in regard to maintenance and improvement of standards of teaching, research, extension collaboration programmes in academic matters and evaluation of workload of the teachers.

The poll results will be declared on November 16.